# सुधा मूर्ती यांच्या अनुवादित कादंब—यांतून घडणारे संस्कृतीचे दर्शन

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. मंजुषा डी. समर्थ**
आर्ट्स कॉलेज, सिहोरा, जिल्हा भंडारा

**संशोधक विद्यार्थी**
**कैलाश एस. पात्रीकर**
पी.जी.टी.डी. ऑफ मराठी
रा.तु.म.नागपूर, विद्यापीठ, नागपूर

---

## सारांश :

*सुधा मूर्ती यांच्या अनुवादित कादंबरीतून भारतीय संस्कृती बरोबरच विश्वात्मक संस्कृतीचे दर्शन घडते. विविध व्यक्तिरेखाच्या वेशभूषेतून भारतीय स्त्री—पुरूष संस्कृतीचे वर्णन त्यांच्या कादंबरीत पाहायला मिळते. भारतीय संस्कृतीचं मोठी विचित्र आहे हे सांगताना त्या म्हणतात, वेगवेगळया भाषा, वेगवेगळे आचार विचार, विभिन्न वेशभूषा, पण सगळयांचे मुळ एकच....चपटया नाकाचे आसामी, गो—या रंगाचे रंगाचे पंजाबी, काळया रंगाचे दाक्षिणात्य, सौंदर्यासाठी प्रसिध्द असलेले काश्मिरी ......एकमेकांचा काहीही संबंध नाही. तरीपण ते भारतीयचं त्यांच्या कादंब—यातून पूजा—पाठ, धार्मिक विधी, सोवळयाचं दर्शन, ग्रामिण संस्कृती बरोबरच शहरी संस्कृतीचेही दर्शन घडते. सामाजिक,सांस्कृतिक वारसा सोबत ऐतिहासिक वारसा जोपासण्याचं कार्य त्यांच्या कादंब—या करतात. भारतातील हिंदू, जैन, मंदिरे, कैलास लेणे, ताजमहल यासारख्या जागतिक दर्जाच्या वास्तू,, सौंदर्य आणि कलेच्या बाबतीत भारत देश किती समृध्द आहे. याचे चित्रण सुधा मूर्ती करतात. रूढी परंपरेसोबतचं विविध खाद्यपदार्थ भारतीय स्त्रीने विदेशात राहून पाश्चिमात्य स्त्रीचे केलेले अनुकरण. मुळ भारतीय पण विदेशात राहूनही भारतीय सण, उत्सव साजरे करणे. हा भारतीय संस्कृतीचा मोठेपणा सुधा मूर्ती यांच्या कादंब—यातून दिसून येतो.*

**सांकल्पनिक संज्ञा :**

अनुवादित कांदबरी, संस्कृती, जीवनमूल्ये, सण—उत्सव, खाद्यपदार्थ, वेशभूषा, ऐतिहासिक स्थळ, वारसा, कला, रीतिरिवाज, समाज, अपशकुन, जातीभेद, प्रांतिक भेद, प्राकृतिक भेद, धार्मिक विधी, सोवळं, पिंडदान, मूंज, श्राध्द, चांदणी भोज.

---

## प्रस्तावना :

मानवी जीवनातील मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या आहेत. अन्नाची गरज ही भूक म्हणून ओळखली जाते. ही भूक शमवितांना आपण अन्न म्हणजे भाकरी, पोळी खातो. ही क्रिया स्वाभाविक असते. ती आपण कष्ट करून मेहनतीने मिळवितो. या सामान्य कृतीला 'प्रकृती' म्हटले जाते. परंतू हीच भाकरी दुस—याकडून हिसकावून घेतली, बळजबरीने मिळवून खाल्ली तर ती स्वाभाविकतेच्या विरूद्ध घडलेली क्रिया होते, या प्रवृत्तीला 'विकृती' असे संबोधतात. परंतू आपल्याला भूक लागली आहे अशावेळी आपल्यापेक्षा ही ज्याला अन्नाची गरज जास्त आहे. त्या गरजवंताला आपल्या भाकरीतला वाटा देण्याची कृती घडते. त्याला 'संस्कृती' असे म्हटले जाते. या मध्ये दुस—याच्या चेह—यावरची तृप्ती, समाधान

Research Hub International Journal

पाहून होणारा आनंद हे संस्कृतीचे लक्षण आहे. दुस–या शब्दात हा सुसंस्कृपणा आहे. याचाच अर्थ संस्कृती भावजीवनाशी निगडित आहे असा होतो. ज्ञानाला आचाराची जोड मिळाली की जे सुंदर मिश्रण तयार होते त्यालाच 'संस्कृती' असे नामाभिधान आहे.

## संस्कृतीचा अर्थ व स्वरूप :

संस्कृती म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर व व्याख्या करणे तितके से सोपे नाही तरीही भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. इरावती कर्वे यांनी ''संस्कृती म्हणजे संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची जीवनपद्धती व जीवनमूल्ये होय'' अशी व्याख्या केली आहे. याचाच अर्थ आपले विचार, उच्चार आणि आचारातून आपण आपले जीवन कशा पद्धतीने जगतो व ते जगणे कोणत्या जीवन मूल्यावर आधारित आहे. याचा अनुभव मिळणे याला संस्कृती म्हणता येईल.

टेलर (Taylor) यांनी ''संस्कृती म्हणजे विविध बाबींचा संकीर्ण संमुच्चय.'' असा विचार मांडला आहे. त्यांच्या मतानुसार ''समाजाचा एक घटक या नात्याने मिळविलेले ज्ञान (Knowledge), कला (Arts), श्रद्धा (Belief), नीतिमूल्ये (Morals), कायदा (Law), रीतिरिवाज (Customs), क्षमता (Capabilities), व संपादित सवयी (Habits), याचा संकीर्ण (Complex) समुच्चय म्हणजे संस्कृती होय.'' या संकीर्ण समुच्चयातून समाज जीवनातील मूलभूत गरजा आणि विविध कार्य यांच्याशी संबंधित जे मानवी वर्तनाचे प्रकार निर्माण होतात त्यालाच ''सांस्कृतीक आकृतिबंध (Culture pattern) असे म्हणतात. त्यामुळेच समाजात आदिवासी संस्कृती, ग्रामीण संस्कृती, शहरी संस्कृती असे प्रकार आढळतात.

माणूस ज्या समाजाचा घटक आहे त्या समाजाचे, सामाजिक वातावरण आणि त्या समाजाचे भौगोलिक (भौतिक) वातावरण यांचा परिणाम त्यांच्या जीवनशैलीवर होतो व त्यातून संस्कृती निर्माण होते. याचा अर्थ भूप्रदेश, हवामान, पर्जन्य, वनस्पती, प्राणी, खनिजे यामुळे तयार होणारे पर्यावरण आणि समाजातील व्यवस्था, रूढी, परंपरा, श्रद्धा, शासनव्यवस्था हे सामाजिक वातावरणातील घटक या शिवाय आर्थिक स्थिती व नैतिकता यांचा प्रभाव मानवी जीवनावर पडून संस्कृती तयार होते. शेवटी संस्कृतीप्रमाणेचं समाजाचे स्वरूप तयार झालेले आढळते. यामुळेचं संस्कृतीत विविधताही आढळते पण या विविधतेतून एकता हे भारतीय संस्कृतीचे खास वैशिष्ट आहे याच संस्कृती दर्शनाचा अभ्यास सुधा मूर्ती यांच्या अनुवादित कादंब–यातून केला आहे.

## सुधा मूर्ती यांच्या कादंब–यातून घडणारे संस्कृतीचे दर्शन :

'अस्तित्व' या कादंबरीत वासंती मैसूरमधल्या ब्राम्हणवस्तीत वाढल्यामूळे परकर–पोलके, पातळ, एकादशी, पोर्णिमा, नवरात्र गुडीपाडवा या सगळया वातावरणात ती वाढली. घरात सगळे शुद्ध कन्नड संस्कार असल्यामुळे श्रावणातल्या मंगळवार आणि शुक्रवारच्या पूजा, तिथल्या लिलीच्या फुलांनी साजरा करीत होती. वासंतीबरोबर मुकेशचे लग्न पारंपरिक पद्धतीने तीन दिवस चालले होते. पण नंतर ती इंग्लंडमधल्या जीवनशैलीचे अनुकरण करते. लांब सडक काळी वेणी जाऊन छोटया छोटया केसांचा बॉबकट आला, जरीची पातळे जाऊन जीन्स पॅट आली. सुमती या व्यक्तिरेखेचे वर्णन करतांना गोरा वर्ण, कुरळे केस, पैशा एवढे मोठे कुंकू, गळयात काळया मण्याचे मंगळसूत्र केसात मोगरीची माळ, कानात हि–याच्या कुडया, हातभर बांगडया अशा वेशभूषेतून भारतीय स्त्री संस्कृतीचे दर्शन घडते. भारतीय संस्कृतीचा मोठेपणा वर्णन करतांना सुधा मूर्ती सांगतात. भारतीय संस्कृतीच मोठी विचित्र आहे. वेगवेगळया भाषा, वेगवेगळे आचार–विचार विभिन्न

वेशभूषा, पण सगळयाचे मूळ एकच.....चपटया नाकाचे आसामी, गो—या रंगाचे पंजाबी, काळया रंगाचे दाक्षिणात्य, सौंदर्यासाठी प्रसिद्ध असलेले काश्मिरी.....एकमेकांचा काहीही संबंध नाही, तरीपण ते भारतीयच! (पृ. क्र.१४) पंजाबी माणसे फार उमद्या स्वभावाची, आदरातिथ्य करणारी असल्याचे दिसून येते.

'महाश्वेता' या कादंबरीत पूजा, पाठ, धार्मिक विधी सोवळयाचं दर्शन घडते. अज्ञानाच्या अंधारामुळे खेडेगावातील लोक अनुपमाला कोडाचा डाग असल्यामुळे वाळीत टाकतात. त्याला आनुवंशिक आजार मानतात त्यामुळे ग्रामिण संस्कृतीतील अज्ञानाचे दर्शन घडते. याऊलट लेखिका शहरी संस्कृतीचे वास्तवदर्शन घडवितांना मुबंई सारख्या शहरात या आजाराकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन ही व्यक्त करतांना दिसतात.

'बकुळा' या कादंबरीत भारतातील प्राचिन संस्कृतीपासून आजतागायत दर्शन घडते. चंद्रगुप्त मौर्य, बिंबिसार, सम्राट अशोक त्यांनी कोरलेले शिलालेख, यासोबतचं अलेक्झांडर, येशू ख्रिस्त यासारखे जागतिक दर्जाचे दाखले ही आलेले आहेत. सम्राट अशोकांनी जिंकलेल्या प्रांताची चतु:सीमाही सूधा मूर्ती रेखाटतात. कर्नाटक राज्याचे तुंगभद्रा नदीने दोन भाग झालेले आहे. तुंगभद्रेच्या दक्षिणेला पूर्वीचे म्हैसूर राज्य होते. यालाच आता दक्षिण कर्नाटक तर नदीच्या उत्तरेला महाराष्ट्र राज्याच्या सरहद्दीपर्यंत पसरलेल्या, प्रदेशाला उत्तर कर्नाटक म्हणतात. या दोन्ही प्रदेशातील लोकांचे रीतिरिवाज, वेशभूषा, रूढी आणि परंपरा, खाण्यापिण्याच्या पद्धती आणि जीवनविषयक दृष्टिकोन या सर्वच बाबतीत भिन्नता आढळते. दोघांची भाषा कन्नड असली तरीही बोलण्याचे हेल, उच्चार, शब्दावरील आघात किंवा अनेकदा शब्दांमध्ये ही फरक असतो.

उत्तर कर्नाटकातील लोक मनमोकळे व सरळ स्वभावाचे दिसून येतात. त्यांच्यात बरेचदा कुलकर्णी, देशपांडे, देसाई पाटील अशी मराठी आडनावे आढळतात. पण ते मराठी मात्र बोलत नाहीत. धारवाडमधील शिक्षणाचा दर्जा फार उत्तम आहे. धारवाड हे कला आणि साहित्याचे माहेरघर मानले जाते. निसर्गाने धारवाडला उत्तम, सकस जमीनीचे वरदान दिले आहे. येथील माणसेसुद्धा शांतताप्रिय, सुशिक्षित आणि सुसंस्कृत असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळातील समाज संपूर्णपणे पुरूषप्रधान होता. त्यामुळे उच्च कुलीन, खानदानी स्त्रियांना खाली मानेनं सर्व दडपणूक सहन करून राहावं लागे उत्तर कर्नाटकातील प्रघातानुसार तुंगभद्रेच्या पलीकडच्या बाजूच्या कोणाशीही इकडच्या बाजूच्या व्यक्तीचा विवाह होत नाही. भारतीय संस्कृतीमध्ये वडिलधा—या माणसाला अरे—तुरे करण हा उर्मटपणा समजला जातो. भारतातील हिंदू, जैन मंदिरे, गणेश मंदिर, कैलास लेणे, ताजमहल या सारख्या जागतिक दर्जाच्या वास्तू, सौंदर्य आणि कलेच्या बाबतीत भारत देश किती समृद्ध आहे. याचे चित्रण सुधा मूर्ती करतांना दिसतात.

'परीघ' या कादंबरीतून 'आलदहळळी' या गावातील ग्रामिण संस्कृतीचे वर्णन येते. हे गाव पुराणकाळापासून प्रसिद्ध आहे. महाभारत काळात पांडव अज्ञातवासासाठी इथे आले होते. मोठं तळ खोदून इथचं त्यांनी आपल्या वडिलांना पिडंदान केल होतं. त्याशिवाय विजयनगरच्या काळी त्याचे संस्थापक व्यासराय यांनी इथे मारूतीची स्थापना केली. याची खूण म्हणजे हनुमंताच्या शेपटीत असलेली घंटा इथे केवळ सातव्या इयत्तेपर्यत वर्ग होते पुढील शिक्षणासाठी शिग्गाव किंवा हुबळीला जाव लागते. सामान्यत: श्रावण महिन्यात नागपंचमीच्या दिवसी मुली—बाळी नवे कपडे लेवून झोपाळयावर झोके घेतांना दिसतात. चैत्र महिन्यात युगाधि म्हणजे गुढीपाडवा हा वर्षारंभाचा सण साजरा केला जातो. या गावात अर्धे लोक हिंदू आणि अर्धे लोक इस्लाम धर्माचे आहेत. हनुमंताच्या देवासमोरच मशिदही आहे. या गावातील लोक मोठया भक्तिभावाने हनुमान जयंती जशी साजरी करतात, तशीच 'पीर फकीर साबचा' उरूस ही साजरा करतात. यासाठी सगळे गावकरी—वर्गणी

गोळा करतात. गावातील बायका मुलं आजारी पडली की, या पीर साबला नवस बोलतात. नवस फेडतात.

उत्तर कर्नाटकाच्या काही भागावर कोकणस्थ ब्राम्हणापैकी मराठी कुटुंब आढळतात. त्यांच्या घरात बोलली जाणारी भाषा मराठी असली, तरी ते घराबाहेर कन्नड बोलतात. त्या—त्या प्रदेशात बोलल्या जाणा—या भाषेचेही कादंबरीत दर्शन घडते. जसे मंगळूरची कोकणी, गोव्याची कोंकणी, पोर्तुगीज कोंकणी, पिंटो घराणे गोवन कॅथालिक समाजाचे ते धार्मिक प्रवृत्तीचे होते. ते दर रविवारी न चुकता चर्चला जातात. दरवर्षी चर्चला वर्गणी देतात, विणकाम, भरतकाम, बेकरी, पुष्परचना यासारख्या हस्तकलेचेही दर्शन घडते. लग्न समारंभ ग्रह, नक्षत्र, कुंडली आणि मुहूर्त पाहूनचं केल्या जाते. पुण्यातील पार्वती, संभाजी पार्क, दगडूशेठ गणपती, खडकवासला, रस्तोरस्ती उसाच्या रसाची 'रसवंती गृह' मुंबईतील एलिफंटा गुहा, गेट वे ऑफ इंडिया, नरिमन पॉइन्ट महाराष्ट्रातील प्रसिद्ध स्थळाचेही वर्णने येतात. मैसूर मधील एकत्र कुटुंब पद्धतीचे दर्शन घडते. या कुटुंबात एकमेकाविषयी असूया, राग, मत्सर, हेवादावा, संताप! तरीही वरवर सगळं उत्तम चालल्याचं नाटक! पाहणा—याला वाटावं, किती सुखी कुटुंब कार्तिकी पौर्णिमेनिमित्त नातेवाईकांना एकत्र बोलवून वडाच्या झाडाखाली चांदणी भोजन करायची पद्धत आहे. टी. नरसीपूरमध्ये बुद्धपोर्णिमेच्या आदल्या दिवसी नरसिंह चतुर्दशीनिमित्त यात्रा भरते. इथे शिवलिंग आणि विष्णुची देवळे अधिक आहेत. विष्णुचाच एक अवतार असलेल्या नरसिंहाची देवळं मात्र क्वचित दिसतात. चपाती, दहीभात, साखर, श्रीखंड, पुळिओगरे, सागु, नाचणीची उकड, ताकीची कढी, ताकातली भाजी, पावटयाची आमटी, भोपळयाची आमटी, नारळाची चटणी अशा अनेक खाद्यान्न पदार्थाचे वर्णन येते.

'हरविलेल्या मंदिराचे रहस्य' या कादंबरीतून ग्रामीण जीवनातील साधेपणाचे, निसर्गाशी येणा—या सहवासाचे तसेच तिथल्या सकारात्मक परंपरेचेही दर्शन होते 'सोमनहळळी' या लहान खेडेगावातील कृषीदर्शन, त्या ठिकाणी घेतली जाणारी विविध पीके, गावातील व गावाशेजारचा नैसर्गीक परिसर, गावातील लग्न, लग्नामधील गावक—याचे सहकार्य, विविध खाद्यान्न पदार्थ, प्राणीसृष्टी, वनस्पतीसृष्टी, त्याचे मानवी जीवनातील उपयोग, उत्खननाच्या वेळी गावक—याचे मिळालेले सहकार्य, कोणताही मोबदला न घेता दाखविलेली माणूसकी, मुलांनी केलेले सहकार्य चा सर्वचं बाबीचे सूक्ष्म दर्शन सुधा मूर्तीनी या कादंबरीतून केल्याचे दिसून येते.

'डॉलर बहू' या कांदबरीत गंधर्व गायन या कलेचे दर्शन घडते. देव, भूत, मोहिनी यासारख्या प्राचिन दाखल्याचे वर्णन येते. चंद्रू—जमुनाच्या लग्नातील फुलांचे डेकोरेशन संगीताचा विशेष कार्यक्रम, आरती अक्षतांचा ताट, सोन्याचे, चांदीचे दागिने परिधान केलेल्या स्त्रीया अस लग्नाचे वैभव हे श्रीमंत संस्कृतीतील लग्नाच्या थाटाचे दर्शन घडविते. लग्न नक्षत्र कुंडली पाहूनच जोडल्या जाते. मनासारखा पती मिळविण्यासाठी नवस बोलला जातो. अमेरिकेत मुलगा—मुलगी लग्नाशिवाय एकत्र राहतात यालाच 'लिव्ह टुगेदर' म्हटल्या जाते. पुराणामध्ये वर्णन केलेले नागलोक, पाताळ लोक, किन्नर लोकांचे दर्शन घडते. अमेरिकेत राहून जमुना तिथल्या संस्कृतीचे अनुकरण करते केसांचा छोटा बॉब, अंगात सैल डगल्याप्रमाणे लांबलचक गाऊन, रितं कपाळ, गळयात मंगळसूत्राचा पत्ता नाही, नाकात चमकी नव्हती. (पृ. क्र.७९)

भारतीय लोक अमेरिकेत राहूनही भारतीय संस्कृतीतील सण, उत्सव साजरे करतात. परंतू इथली पद्धती वेगळी दिसून येते. इथे सण—उत्सव पंचाग नुसार साजरे न करता आठवडयाच्या वीक एंडला साजरे करतात. तिथे प्रत्येकाने एकेक सण वाटून घेतल्याचे दिसून येते. जसे जयाकडे युगादि (गुडीपाडवा), उमाकडे गणेश चतुर्थी, सुधाकडे संक्रात, तर कुणाकडे दिवाळी साजरी केली जाते. फक्त ख्रिसमस हा एकमेव सण

संगळयांचा सण म्हणून साजरा केला जातो. तिथे भारतीय लोक वेगवेगळया भाषामध्ये बोलत असले तरी मुलं मात्र एकमेकांशी इंग्लिशमध्ये बोलताना दिसून येतात. तिथले भारतीय खाद्यपदार्थाचे सेवन करतांना दिसतात. जसे जिलेबी, बेसन लाडू, खारी बुंदी, तांदुळ, समोसे, पालक पनीर, चना, चित्रा ख्रिश्चन धर्मातील जोसेफशी लग्न करून ही ती हिंदू धर्मातील देवदेवतांची पूजा करते. त्यांच्यात कुठलाही धर्माचरण आड येत नाही ती देवळात जाते मंगलसूत्र घालते. तिच्या घरी एका कोप—यात मले महादेवाचे चित्र होतं. त्याला चंदनाचा हार घातला होता. शेजारीच मेरीची मूर्ती होती. समोर मेणबत्ती ठेवली होती. (पृ. क्र.९७) शामावर भारतीय संस्कार घडावेत म्हणून तिचे आई—वडील सगळे सण, अनेक पूजा, धार्मिक विधी घरी करतांना दिसून येतात. (पृ. क्र. १०३)

'पितृऋण' या कादंबरीत शांता ही 'धर्मस्थळ' या गावातल्या मंजुनाथाला नवस करून झालेली होती. ती व्यवहारी व आधुनिक विचारसरणीची असल्यामुळे क्लबमध्ये जाते. गणेशोत्सव, दसरा, राज्योत्सव, दिवाळी, पाडवा, सगळे सण साजरे होतांना दिसून येतात. लहान मुलाचे केस कापून शेंडी ठेवली जाते या रिवाजाला मूंज काढणे म्हटल्या जाते. दडपेपोहे, चकली, बेसनाचा लाडू, तांदळाचा भात, रवा लाडू, उडदाचे वडे यासारख्या खाद्यपदार्थाचे दर्शन घडते. चांदणी जेवणाच्या वेळी सगळे पदार्थ पांढरे शुभ्र हवेत म्हणून दहीभात, पांढ—या करज्या, शेवयाची खीर, पाकातले पांढरे चिरोटे, तांदळाच्या रव्याचा उपमा, कोबीची भाजी असे पाढरेच पदार्थ बनविण्याची संस्कृती आहे. (पृ. क्र.३१)

शिशुनाळ येथील लोकांचा कुंडली, नक्षत्रावर विश्वास दिसून येतो म्हणूनचं मंदाकिनीच्य नशिबी मूळ नक्षत्र असल्यामूळे सास—याशिवाय असलेल्या स्थळाचा शोध घेतल्या जाते. सोबतचं वर दक्षिणा म्हणून मुलाला हुंडा देण्याचीही पद्धती दिसून येते. 'हुबळी' गावामध्ये साहित्यीक आणि संगीत कलांचा भरणा दिसून येतो. व्यंकटेश आणि शंकर मास्तर परंपरेने आलेला श्राद्ध करतांना दिसतात. श्राद्धाच्या वेळी केळीच्या पानात जेवण वाढण्यात येते. शुर्पाली सारख्या खेडयात बालविवाह आणि केशवपन यासारखी अनिष्ठ प्रथा दिसून येते. त्या काळचं त्या गावातील वातावरण कर्मठ होते. कर्मठ लोकांच्या ब्राम्हण वस्तीत सोवळं ही कडक होतं नुकतीच बाळंत झालेली सोळा वर्षाची भागव्वा मनात नसून ही सामाजिक दृष्टीला बंदिस्त होते. पती निधनानंतर तिला केशवपन करावे लागते. पूजेच्या वेळी, मंगलप्रसंगी तिचं तोड पाहणं ही अमंगल समजल्या जाते. तरूण भागिरथी म्हणजेचं सगळयासाठी अपशकुन, अपकीर्ती आणि अपमान होती. तरीही मृत पतीवर तिची निस्सीम श्रद्धा होती. ती आपल्या पतीचा तिरस्कार न करता दरवर्षी मुलाच्या हातून श्राद्ध करतांना दिसून येते. नियतीच्या बळी ठरलेल्या पित्याची जबाबदारी स्वत:चे अर्ध्य देऊन पूर्ण करणारा कर्तव्यशील पुत्र आपल्या कर्तव्याच्या पूर्ततेसाठी उभी राहिलेली व्यंकटेशाची कन्या गौरी हे संस्कृतीचे अतुट दर्शन घडविणारे पिता—पुत्री यांचे नाते सुधा मूर्ती यांनी रेखाटलेले आहे.

**निष्कर्ष :**

१. सुधा मूर्ती यांच्या कादंबरीतील सांस्कृतिक स्वरूप वास्तवदर्शी व तटस्थपणे रेखाटलेले दिसून येते.
२. त्यांच्या अनेक कादंबऱ्या भेदातून—अभेदाकडे, विरोधातून—विकासाकडे, विकारातून—विवेकाकडे, गोधंळातून—व्यवस्थेकडे जाणे असा प्रवास करतांना दिसतात.
३. सुधा मूर्ती यांच्या कादंबरीतून विश्वात्मक सांस्कृतिकतेचे दर्शन घडते.
४. सुधामूर्ती कृतज्ञतेचा भाव अनेक सणांच्या माध्यमातून त्यांच्या कादंबरीत चित्रीत करतात.

५. आर्थिक विविधतेचे दर्शन घडवितांना सुधा मूर्ती अतिश्रीमंत, श्रीमंत, मध्यम वर्गीय, गरीब दारिद्र्यात जीवन जगणा–या समाजातील सर्वकष लोकांचे जीवनमान तसेच ग्रामिण, शहरी भारतीयांसोबतच, पाश्चात्य जगाचे ही चित्रण करतात.

६. पारंपरिक रूढी, त्या रूढीमागील असलेली श्रद्धा प्रादेशिक भेद, प्राकृतिक भेद, खाणपान, बोली भाषा, उच्चारणाचे ही दर्शन त्यांच्या कादंबरीतून घडते.

७. सुधा मूर्तीनी भारतीय संस्कृतीच्या समृद्ध वारसाचे जतन आणि संक्रमण कादंबरी लेखनातून केल्याचे निदर्शनास येते.

८. 'धर्मनिरपेक्षता' या मूल्यांची जाणीव करून देतांना सुधा मूर्ती जोसेफ आणि चित्रा यांची व्यक्तिरेखा साकारतात.

९. विविध प्रातांतील सांस्कृतिक भेद, भाषाभेद याचेही वर्णन त्यांच्या कादंबऱ्यातून येते.

१०. सुधा मूर्ती यांच्या कादंबरीतून अनेक ऐतिहासिक स्थळाचे वर्णन व आपल्या देशातील समृद्ध सांस्कृतिक जाणिवेचा अभिमान व्यक्त होतांना दिसतो.

११. सुधा मूर्ती यांनी पुरूषप्रधान संस्कृतीतून स्त्री संवेदनाचा विचार ही कांदबरीतून केला आहे.

१२. सुधा मूर्ती यांच्या अनुवादित कादंबऱ्या सांस्कृतीक परिवर्तन घडविण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

## संदर्भ टिपा :

- मूर्ती सुधा, अनुवाद प्रा.ए.आर.यार्दी, 'अस्तित्व', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, २६ एप्रिल २००२, पृ.क्र.१४
- मूर्ती सुधा, अनुवाद उमा वि.कुलकर्णी, 'डॉलर बहू' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर २००३, पृ.क्र.७९
- तत्रैव – पृ. क्र. ९७
- तत्रैव – पृ. क्र. १०३
- मूर्ती सुधा, अनुवाद उमा वि.कुलकर्णी, 'महाश्वेता', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २००२,
- मूर्ती सुधा, अनुवाद उमा वि.कुलकर्णी, 'परीघ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, ४ नोव्हेंबर २०१३,
- मूर्ती सुधा, अनुवाद लीना सोहोनी, 'बकुळा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २००९,
- मूर्ती सुधा, अनुवाद लीना सोहोनी, 'हरवलेल्या मंदिराचे रहस्य', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, सप्टेंबर, २०१६,
- मूर्ती सुधा, अनुवाद संदाकिनी कट्टी, 'पितृऋण', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ऑक्टोबर २००९, पृ.क्र.३१
- अरविंद लो.कपाले, सौ. आरती प्र. सपकाळे, 'भारतीय समाज आणि शिक्षण', निराली प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती सप्टेंबर, २०१७

Research Hub International Journal